नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०२/२०२५ (बुधवार) सकाळ**

## बनावट देशी दारू तयार करण्याचे कारखान्यावर छापा, ११ लाख ८२ हजार, ५२० रूपयांचा मुददेमाल जप्त, २ आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १९/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा कडुन खात्रीशिर माहीती मिळाली की,पंकज कुमार बैचेन सिंग, रा.भानेगाव हा त्याचे शेती व्यवसायाचे आड मध्ये कोंढाळी हद्दीतील मौजा मरगसुर शेत शिवारात अवैधरीत्या, विनापरवाना बनावट देशी दारू तयार करण्याचा कारखाना चालवुन बनावट देशी दारू तयार करीत आहे.अशी माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर ठिकाणी जावुन छापा टाकला असता आरोपी नामे १.मिथुन महादेव शहा, वय ३७ वर्षे, रा. चणकापुर २.पंकज कुमार बैचेन सिंग रा.भानेगाव हे जगीच मिळुन आले.आरोपीच्या ताब्यातुन १) २ बॉटल कॅप सिलींग मशीन १,५०,०००/— रूपये,२) १६ बॉक्स ज्यामध्ये बनावट देशी दारूच्या १६०० नग ९० एमएल च्या बॉटल किंमती ५६,००० /— रूपये ,३) २०० लीटरचे प्लॅस्टीक ड्रम ज्यामध्ये स्पीरीट द्रव पदार्थ भरून असलेले किंमती ६०,००० /— रूपये,४) ६ खरड्याचे बॉक्स ज्यामध्ये बनावट देशी दारूच्या ७५० नग ९० एमएल च्या बॉटल किंमती २२,५०० /— रूपये ,५) दोन प्लास्टो कंपनीची टाक्या १००० लीटरच्या त्यात २,००० लीटर आरो फिल्टर बॉटर स्पीरीर लिक्यीड आरटीफीशिअल फ्लेवरिंग कम्पाउन्ड लिक्वीड असे मिक्स असलेले किमती ६,६०,००० /— रूपये,६) १ व्ही गार्ड कंपनीचे टिल्लु पंपं किमती २५०० /— रूपये,७) १२ नग प्लॅस्टीक कॅरेट किमती ४५००/— रूपये,८) १२ खरडयाचे बॉक्स मध्ये १०,००० नग याप्रमाणे १,२०,००० नग जर्मनी झाकण किंमती १,२०,०००/— रूपये ९) १८० रिकामे खरडयाचे बॉक्स ज्यावर रॉकेट देशीदारू प्रवरा डिस्टीलरी प.डॉ.वि.पा.स.सा.का.लि प्रवरानगर जि. अहमदनगर महाराष्ट्र असे लाल रंगामध्ये प्रिन्ट असलेले किमती ३०००/— रूपये,१०) ३० नग रॉकेट देशीदारू प्रवरा डिस्टीलरी प.डॉ.वि.पा.

स.सा.का.लि. प्रवरानगर जि अहमदनगर महाराष्ट्र बॅच न. ३३५ जानेवारी २०२५ असे लेबल बंडल प्रत्येकी ४,५००/— रूपये,११) २४ बॉक्स मध्ये इंटरनॅशन फ्लेवर ॲन्ड फ्रेग्नस इंडीया प्रा. लि. कंपनीचे आरटीफीशिअल ऑरेन्ज फ्लेवरिंग कम्पाउन्ड लिक्वीड भरून असलेले किमती ९१२०/— रूपये , १२) ०७ नग निळया रंगांचे ड्रम प्रत्येकी किंमती ७०००/— रूपये तसेच टेप,द्रवमोजण्याचे साहीत्य ,थर्मामीटर ,इनर्वटर,लेबल व इतर साहीत्या सह **एक हिरोहोन्डा कंपनीची स्प्लेन्डर मोटर सायकल जुनी वापरती क. एम.एच ३१ बी जी ००९७ किमती २०,०००/ रूपये असा एकुण ११,८२,५२० रूपयांचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला**

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अरोपी नामे **१.मिथुन महादेव शहा, वय ३७ वर्षे, रा. चणकापुर २.पंकज कुमार बैचेन सिंग रा.भानेगाव, पाहिजे आरोपी —३.विशाल शंभू मंडल, रा. चनकापुर ,४.राजेंद्र यादव रा. चनकापुर ,५.सागर सिंग रा.तळेगाव** यांच्यावर कलम १२३,३१८(४),३३८,३४०,३(५) भा.न्या.सं सह कलम ६५ (अ)(ब)(क)(ड)(फ),६७ (१)(अ) ,६७(क) ,७२,८३,८६,९० मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने २ आरोपीसह सह मुददेमाल कोढांळी पोलीसांना सुपुर्द केला. दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करीत आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक १८/०२/२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पेट्रोलींग केली असता चिचघाट, कुही येथे संशयीत **लाल रंगाचे ट्रक्टर क्र एमएच ४० सी एच ९७६१ चे लगत असलेली लाल रंगाची ट्राली क्र एम एच ४० सह क्यु २७३६ मिळुन आले ट्रक्टर** थांबवुन **ट्रक्टरची** पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक्टर** चालक आरोपी नामे विशाल गणपत मेहर वय २९ रा राजुला ता. कुही याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.तसेच रेतीची वाहतुक **ट्रक्टर** चा मालक रा राजुला ता. कुहीयांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १ ब्रास रेती किंमती ५,०००/रूपये आणि २) **लाल रंगाचे ट्रक्टर क्र एमएच ४० सी एच ९७६१ किंती ७,००,००० /— रूपये ३) लाल रंगाची ट्राली क्र एम एच ४० सह क्यु २७३६** किंमती १,००,०००/—रूपये असा एकुण ८,०५,०००/रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**ट्रक्टर** चालक नामे विशाल गणपत मेहर वय २९ रा राजुला ता. कुही आणि २. **ट्रक्टर** मालक याच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९ बीएनएस सहकलम ४८(७), ४८(८), महा.जमीन महसुल संहिता सहकलम ४,२१, खाण आणि खनिज अधि. सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर